# सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांत जनजागृती

■ (सायली देवकुळे : केबीपी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अ‍ॅण्ड रिसर्च, वर्ये)




वर्ये : सायबर सुरक्षेबाबत जनजागृती कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी.

सायबर सुरक्षाबाबत काळजी घेण्यासाठी सायबर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. केबीपी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अ‍ॅण्ड रिसर्च महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये इंटरनेट बँकिंगचा वापर करताना, बनावट फेसबुक अकाऊंट, अकाउंट हॅक होऊन नये म्हणून काळजी घेण्याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. सायबर सुरक्षेबाबत महाविद्यालयातील बीसीए विभागाच्या वतीने सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

क्विक हिल फाऊंडेशन यांच्या सहकार्याने लायन्स इंटरनॅशनल क्लबच्या रिजन २ आयोजित गॅट एलसीआयएफ कॅनक्लेव कार्यक्रमात जनजागृती करण्यात आली. सोशल मीडियाचा वापर करताना युवती व महिलांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यांच्या नावाने बनावट खाते तयार करून अथवा हॅक करून त्रास देणे, बदनामी करणे असे उद्योग केले जातात. हे गुन्हे करण्याचे प्रमाण खूप वाढले आहेत.

एटीएम, डेबिट कार्ड वापरणारे अथवा इंटरनेट बँकिंगचा वापर करणाऱ्या फोनवरून दुसऱ्यांना कोणतीही माहिती देऊ नये, फोनवरून माहिती घेऊन ऑनलाइन फसवणूक करण्याचे प्रमाण वाढले आहे. सायबर गुन्हे शंभर टक्के उघडकीस येतात, याची माहिती देण्यात आली.